# ज्ञानयज्ञ


**आमचे ध्येय:**

*गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.*

SD SEED

Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development

सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना



## एसडी–सीड...
## विद्यार्थ्यांचे दीपगृह

एसडी-सीड शिष्यवृत्ती २०१६ जाहीर (तपशील पान ९ वर)

वर्ष ५ | अंक १४ | मे – ऑगस्ट २०१६



# "शैक्षणिक समस्या व निराकरण"



'तुमचा आजचा संघर्ष तुमचे उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो' त्यामुळे विचार बदला आणि तुमचे आयुष्यही! प्रतिकुल परिस्थिती व जीवनातील संघर्षामुळे जे शिक्षण होते ते कोणत्याही शाळेत होत नाही, त्याकरिता प्रतिकुलतेकडे आपण संधी म्हणून पहायला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज प्रतिकुलतेचा बाउ करीत बसले नाहीत. मुठभर विश्वासू मावळे व सर्व जाती–धर्माच्या सहका–यांना सोबत घेवून अत्यंत कठिण परिस्थितीवर त्यांनी मात केल्याचा इतिहास सर्वांना माहित आहे.

विद्यार्थी दशेत तुम्हाला असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागते. विशेषत: अत्यंत बिकट परिस्थिती असलेले विद्यार्थी व काही अत्यंत प्रगत आर्थिक परिस्थिती असलेले विद्यार्थी यास बळी पडतात. आपले मुलभूत शैक्षणिक प्रश्न सोडवितांना गरिब विद्यार्थ्यांना अगदी मुलभूत सुविधांसाठी झगडावे लागते. जसे शहरातील महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यानंतर निवासाची व्यसस्था यात हॉस्टेल्स किंवा खाजगी रूम अत्यंत महागडी असतात. त्यातूनही थोडाफार काही प्रमाणात मार्ग निघू शकतो जसा कमी सुविधा असलेला रूम, नातेवाईकांची मदत इत्यादी. दुसरा अत्यंत ज्वलंत प्रश्न म्हणजे शिकवणी वर्ग लावण्याची अपरिहार्यता. समाजातील उघडे सत्य म्हणजे बहुसंख्य महाविद्यालयांमध्ये नियमित तासिका होत नाहीत म्हणून नाईलाजाने महागड्या शिकवणीवर्गाकडे वळावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांची कुचंबणा होते.

परिणामत: काही अनाआरोग्यदायी समस्या, अशैक्षणिक परिसर, महागडे शिकवणीवर्ग, स्वस्त ठिकाणांचा आसरा घेतल्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीवर, आरोग्यावर, शैक्षणिक प्रगतीवर त्याचे विपरित परिणाम दिसून येतात. पर्यायाने त्यांची अभ्यासातील गुणवत्ता कमी होते. ब–याच विद्यार्थ्यांना खाजगी शिकवणीवर्ग न परवडल्यामुळे जमेल तसा, जमेल तेवढा अभ्यास करून परिक्षेला सामोरे जावे लागते. या गोष्टींचाही विपरित परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असतो.

तिसरी महत्वाची भेडसावणारी समस्या म्हणजे १०वी व १२वीचा निकाल लागल्यानंतर सर्वसाधारणपणे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शनाचा खुप मोठा अभाव दिसून येतो. त्याकारणाने अगदी प्रवेश फॉर्म भरतांना क्षुल्लक चूक देखील विद्यार्थ्यांना महागात पडते व विद्यार्थ्यांची पुढील शैक्षणिक दिशा बदलू शकते.

असे विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांशी म्हणजे ज्यांना सर्व सुख–सुविधा मिळतात त्यांच्याशी तुलना करू लागतात आणि एक मोठी असमानतेची शैक्षणिक दरी विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होते व विद्यार्थी आपसुकच नैराश्येच्या दरीत ढकलला जातो.

अतिसुख–सोईमुळे किंवा पालकांच्या दुर्लक्षामुळे काही लाडावलेली श्रीमंतांची बाळं मोबाईल फोन, व्हॉट्स–अप, इंटरनेट इत्यादी गॅझेटस्चा दुरूपयोग करून त्यांच्यात 'गॅझेट्स व्यसनाधिनता' निर्माण होत आहे. या गोष्टींकडे गंभिरपणे बघण्यासाठी पालकांना वेळ नसतो आणि त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचीही शैक्षणिक गुणवत्ता खालावते. अशा विद्यार्थ्यांना वाईट संगत लागण्याची दाट शक्यता असते.

वरील सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचे निवारण व समुपदेशन करण्यासाठी एखाद्या सक्षम व्यासपीठाची आवश्यकता भासू लागते. समाजातील काही संस्था अशा तळागळातील व समस्याग्रस्त विद्यार्थ्यांसाठी तळमळीने कार्यरत आहेत. अशा प्रकारच्या चांगल्या ध्येय–धोरणांनी भारावलेली जळगाव जिल्ह्यासाठी काम करणारी, शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून दैदिप्यमान कार्य करणारी मा. सुरेशदादा जैन यांच्या औदार्यातून निर्माण झालेली संस्था म्हणजे सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना अर्थात एसडी–सीड ही होय.

या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना करण्यासाठी सतत प्रयत्न केले जातात. जिल्ह्यातील निरनिराळया क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचा ओघ या संस्थेकडे धाव घेत असतो आणि आपली गुणवत्ता संस्थेच्या कार्यासाठी समर्पित करित आहे.

२००८ मध्ये लावलेले हे इवलेसे रोपाचे आज वटवृक्षात रूपांतर होवून असंख्य लाभार्थी त्याची सुमधूर फळे चाखत आहेत. म्हणून म्हणावेसे वाटते – 'शुध्द (एसडी) बिजापोटी (सीड), फळे रसाळ गोमटी'. आज एसडी–सीडची ही वाटचाल बघून खुपखुप आनंद होतो. समाजातील भेदभाव, आर्थिक दरी मिटविण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून समता प्रस्थापित करण्याचा खारूताईचा वाटा जरी एसडी–सीडमार्फत झाला तरी खुप मोठे काम होईल.

शेवटी विद्यार्थ्यांना सांगावेसे वाटते की, कोणत्याही संकटांना, परिस्थितीला घाबरून न जाता आणि आपल्या नशिबाला, परिस्थितीला दोष न देता कार्य पुर्ण करा. उदाहरणार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडेकर अत्यंत प्रतिकुल परिस्थितीला धैर्याने तोंड देत सर्वोच्च पदावर पोहचले. प्रत्येक गोष्टीसाठी काळ–वेळ ठरलेली असते. योग्य वेळ आणि संधी मिळण्यासाठी संयम व चिकाटी बाळगा. 'आकाशातील चांदण्यांनाही चमकण्यासाठी रात्रीच्या काळोखाची वाट पहावी लागते' म्हणून उतावीळपणा न करता संयम बाळगा.

एसडी–सीडच्या विद्यार्थ्यांसाठी समर्पित अशा या महान सर्वांगिण शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा व अभिवादन!

**– प्रा. एस. व्ही. सोमवंशी**

**सल्लागार समिती सदस्य, एसडी–सीड, जळगाव**

| या अंकात... | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. संपादकीय | २ |
| २. अभ्यासाचा ॲड ऑन पर्याय | ३ |
| ३. विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | ४ व ५ |
| ४. योग: आनंदी जीवनाचा राजमार्ग | ६ |
| ५. एक संधी स्वत:साठी | ७ |
| ६. लाभार्थ्यांचे मनोगत | ८ |
| ७ शिष्यवृत्ती २०१६ जाहिरात | ९ |

## ज्ञानयज्ञ संपादक मंडळ

श्री. राजेश यावलकर – ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक, श्री. एन.जे. गादिया, श्री. महेश गोरडे, श्री. नीळकंठराव गायकवाड, श्री. मिलींद कुलकर्णी, प्रा. एस.व्ही. सोमवंशी

## अभ्यासाचा ॲड ऑन पर्याय



अभ्यास आणि आवड दोन्हीचा समतोल राखत पुढे जायचे असेल तर चालू अभ्यासक्रमासोबत विद्यार्थी ॲड ऑन कोर्सेसचा पर्याय निवडू शकतात. अनेक कॉलेजांमध्ये या ॲड ऑन कोर्सेसची सोय उपलब्ध आहे. या अभ्यासक्रमांतर्गत एक वर्ष पूर्ण केल्यास प्रमाणपत्र, दोन वर्ष पूर्ण केल्यास डिप्लोमा तर तीन वर्ष पूर्ण केल्यास ॲडव्हान्स डिप्लोमा प्राप्त होतो.



### कम्प्युटर ॲप्लिकेशन

**पात्रता:** बारावी

**संधी:** कम्प्युटर ज्ञानामुळे विद्यार्थी कुठल्याही क्षेत्रात काम करू शकतात. तसेच सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणूनही काम करू शकतात.



### कम्युनिकेशन ॲड इव्हेंट मॅनेजमेंट

**पात्रता:** बारावी

**संधी:** विद्यार्थी स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकतात. तसेच इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्यांमध्ये नोकरीसाठीही अनेक संधी उपलब्ध आहेत.




### परदेशी भाषा – फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, जॅपनीज

**पात्रता:** बारावी

**संधी:** भाषांतरासाठी तसेच दुभाषी म्हणून सुद्धा या विद्यार्थ्यांना उत्तम संधी आहेत.



### कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंट

**पात्रता:** बारावी

**संधी:** कस्टमर केअर मॅनेजर, कॉर्पोरेट सर्व्हिस मॅनेजर, कस्टमर रिलेशनशिप मॅनेजर आणि कस्टमर ऑपरेशन्स मॅनेजर म्हणून कॉर्पोरेट क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत.



### ट्रॅव्हल ॲड टूरिझम

**पात्रता:** बारावी

**संधी:** ट्रॅव्हल ॲड टूरिझम क्षेत्रात टूर प्लॅनर म्हणून या विद्यार्थ्यांना मोठी मागणी आहे.




### स्टॉक मार्केट

**पात्रता:** बारावी

**संधी:** शेअर बाजाराज करिअर करायचे असल्यास या अभ्यासक्रमाचा खूप फायदा होतो. विद्यार्थी स्वत: ब्रोकर म्हणूनही काम करू शकतात. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थी एनएससी व बीएससीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रमही करू शकतात.

मागील चार महिन्यात एसडी–सीडने खाली दिलेल्या विविध विषयांवर एकूण १२ प्रशिक्षण कार्यक्रम राबविले. त्यात सुमारे १९०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

### 'करिअर मार्गदर्शन' व 'अभ्यासाचे महत्त्व'

**मार्गदर्शक:** श्री. प्रविण सोनवणे – एसडी–सीड सहकारी

**ठिकाण:** १. महाराणा प्रताप माध्य. व उच्चमाध्य. विद्यालय, जळगाव
२. माध्यमिक विद्यालय, शारदा नगर, जळगांव

**उपस्थिती:** सुमारे ३२५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट:** १. विद्यार्थ्यांनी स्वत:ला ओळखून त्यांच्यातील बलस्थाने, कमतरता, कौशल्य आणि आवड लक्षात घेवून कुठल्या विषयात त्यांनी करिअर करायचे याबाबत मार्गदर्शन करणे.

२. शैक्षणिक यश मिळविण्यासाठी अभ्यास किती वेळ करावा यापेक्षा अभ्यास कसा करावा हे अधिक महत्त्वाचे आहे. तसेच त्याचा ताण निर्माण होवू नये आणि शिकलेल्या गोष्टी दीर्घकाळ राहण्यासाठी काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे.



### 'स्मरणशक्ती व एकाग्रता विकास' – २ कार्यक्रम

**मार्गदर्शक:** प्रा. सुरेश पांडे

**ठिकाण:** १. जय दुर्गा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव
२. माता रमाबाई आंबेडकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव

**उपस्थिती:** सुमारे ३६० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट:** कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी व आपल्यावर सोपवलेल्या जबाबदा–या चांगल्या प्रकारे पार पाडण्यासाठी तल्लख बुद्धी आणि मनाची एकाग्रता असणे फार आवश्यक आहे.



### 'मुलाखत कौशल्य' – २ कार्यक्रम

**मार्गदर्शक:** प्रा. सुरेश पांडे आणि श्री. ईश्वर जैन

**ठिकाण:** १. एस.एम.आई.टी. कॉलेज, जळगांव
२. नॉर्थ महाराष्ट्र नॉलेज सिटी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नोलॉजी, जळगाव

**उपस्थिती:** सुमारे ३२० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट:** आजच्या स्पर्धात्मक युगात एकापेक्षा एक नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. त्या मिळविण्याठी मुलाखत कौशल्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यात अर्ज करणे, पूर्व लेखी परीक्षा, मुख्य लेखी परीक्षा, मुलाखत, इ. योग्य ते मार्गदर्शन त्यांना मिळायला हवे.



### 'वेळेचे नियोजन' – २ कार्यक्रम

**मार्गदर्शक:** प्रा. अभिजित कुलकर्णी आणि प्रा. एस.व्ही. सोमवंशी

**ठिकाण:** १. नंदिनीबाई वामनराव मुलींचे कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव
२. भगिरथ इंग्लिश शाळा, जळगाव

**उपस्थिती:** सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट:** कोणतेही कष्टदायी कार्य अधिक वेळेपर्यंत करण्यापेक्षा उत्कृष्ट पद्धतीद्वारे सहज व जलदगतीने साध्य करण्याचे उत्तम साधन म्हणजे वेळेचे नियोजन होय. विद्यार्थी जीवनात वेळेचे नियोजन ही एक महत्त्वाची बाब असते. वेळेला जर महत्त्व दिले तर ठरविलेले ध्येय निश्चितीपर्यंत पोहोचता येवू शकते.



### 'इंग्रजी संभाषण कौशल्य'

मार्गदर्शक: प्रा. सुरेश पांडे

ठिकाण: माध्यमिक विद्यालय, बांभोरी, जळगाव

उपस्थिती: सुमारे १४५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे उद्दिष्ट: संभाषण हे माणसाच्या आयुष्यातील सर्वात मोठी शक्ती आहे. ज्या माणसांकडे भक्कम संभाषण कौशल्य नाही, त्याची आयुष्याची इमारत कधीही उभी राहू शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसोबतच 'प्रभावी संभाषण कौशल्य' असणे अत्यंत महत्वाचे आहे, जेणेकरून त्यांना आपल्या जीवनात यशस्वी होता येईल.




### 'मनाची एकाग्रता'

मार्गदर्शक: श्री. प्रविण सोनवणे – एसडी–सीड सहकारी

ठिकाण: प्रेमाबाई माध्यमिक विद्यालय, जळगाव

उपस्थिती: सुमारे १३० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे उद्दिष्ट: विद्यार्थी जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर प्रभावीपणे अभ्यास करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी मनाची एकाग्रता असणे तितकेच महत्वाचे आहे. म्हणून कठोर परिश्रम करण्याची जिद्द विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी म्हणजे यशाच्या शिखरापर्यंत निश्चितच त्यांना पोहोचता येईल.



### 'श्रवण कौशल्य विकास'

मार्गदर्शक: श्री. महेश गोरडे एसडी गव्हर्निंग बोर्ड सदस्य

ठिकाण: महाराणा प्रताप माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय, जळगाव

उपस्थिती:सुमारे १८० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे उद्दिष्ट: विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्यांचा विकास व्हावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा, ज्ञानात भर पडावी व एक सुशिक्षित विद्यार्थी घडावा व जीवनात यशस्वी व्हावा. त्याचबरोबर चुकीच्या संदेशाची देवाणघेवाण होवू नये म्हणून श्रवण कौशल्य फार महत्वाचे आहे. ज्यामुळे एखादा संदेश अधिक स्पष्टपणे समजला जावू शकतो.



### 'योगाचे महत्त्व'

मार्गदर्शक: प्रा. देवानंद सोनार

ठिकाण: एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालय, जळगाव

उपस्थिती: सुमारे १५० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे उद्दिष्ट: विद्यार्थ्यांना त्यांची एकाग्रता आणि धारणा शक्ती सुधारण्यास मदत व्हावी त्याचबरोबर त्यांनी अभ्यासाचा कमी ताण घ्यावा यासाठी योगा करणे फार महत्वाचे आहे. त्याचबरोबर नेहमी योगा केल्यामुळे आत्मविश्वास वाढतो, संघर्ष करण्याची जिद्द निर्माण होते आणि मानसिक समतोल आणि स्वत:वरील नियंत्रण राखण्यास मदत होते.



# योग: आनंदी जीवनाचा राजमार्ग



धकाधकीच्या आजच्या युगात जीवन जगताना अशा अनेक समस्या आपल्या समोर निर्माण होतात की, या समस्यांमुळे आपल्या प्रगतीचा मार्ग मंदावतो. लहान मोठ्या समस्यांनी आपले जीवन तणावग्रस्त होवून मानसिक ताण, उदासिनता, नैराश्य, एकाकीपणाची भावना, न्यूनगंड इत्यादी मानसिक विकारांबरोबरच मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, माइग्रेन, पचनाचे विकार, अनिद्रा, अस्थमा यांसारख्या अनेक विकारांनी मनुष्य ग्रस्त होतो आणि त्याला आपले भविष्य अंधःकारमय दिसू लागते. काही व्यक्तींकडे या समस्यांतून बाहेर पडण्याचे कौशल्य असते तर काही व्यक्ती अशा समस्यांना सामोरे न जाता पूर्णतः खचून जातात. परिणामी मरणयातना देणारे नको असणारे जीवन मृत्यू येत नाही म्हणून जगत राहतात. असे जीवन जगणा—यांसाठी योग एक संजीवनी म्हणून कार्य करते.

'योग' या शब्दाचे दोन अर्थ आहेत. पहिला 'युजिर योगो' आणि दुसरा 'युज समाधौ.' अर्थात् प्रथम युजिर योगो याचा अर्थ जोडणे आणि दुसरा युज समाधौ याचा अर्थ समाधि. मनुष्य आपल्या मूळ स्वरूपाला विसरून भौतिक मायावी दुनियेत रममाण होवून ऐहिक सुखाच्या हव्सायाने दु:खाच्या खाईत लोटला गेला. त्याला यातून बाहेर काढून समाधि अवस्थेला उपलब्ध करण्यासाठी योग हा एकमेव मार्ग आहे.

मनुष्याचे शरीर, मन, बुद्धी यांचे समायोजन न साधल्यामुळे तो आपल्या आनंदमय स्वरूपापासून दुरावत गेला. मन, बुद्धी, आत्मा यामध्ये सायुज्यता साधून आत्मसाक्षात्कार करून मोक्षासाठी प्रयत्न करता येतो. म्हणूनच महर्षी पतंजलींनी योगाला परिभाषित करताना 'योगश्चित्तवृत्तिनिरोध:' असे म्हटले आहे. अर्थात् चित्तातील वृत्तींचा निरोध करणे, त्यांना शांत करणे म्हणजे 'योग' होय. चित्तातील या वृत्तींना शांत करण्यासाठी म. पतंजलींनी अष्टांगयोगाचे वर्णन पंतजल योगसूत्र या ग्रंथामध्ये केले आहे. त्यात खालील आठ मार्गांचा समावेश आहे.

१. **यम: अर्थात् अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रम्हचर्य यांचे पालन करणे.**
२. **नियम: शरीर व मनाला उच्च साधनेसाठी पात्र बनविण्याच्या उद्देशाने शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान यांचे पालन करणे.**
३. **आसन: शरीर व मनाची स्थिर आणि सूखपूर्वक अशी अवस्था.**
४. **प्राणायाम: प्राणशक्तिच्या विस्तारासाठी, प्राणावर नियंत्रण प्राप्त करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न.**
५. **प्रत्याहार: ज्ञानेंद्रियांना त्यांच्या विषयांपासून विन्मुख करून अंर्तमुखी करणे.**
६. **धारणा: चित्ताला एका ठिकाणी स्थिर करण्याचा प्रयत्न करणे.**
७. **ध्यान: मनाला ध्येय वस्तुवर अधिक काळपर्यंत टिकविणे.**
८. **समाधि: ध्याता, ध्यान आणि ध्येय या त्रिपुटीचा नाश होवून ध्येयाशी एकरूप होणे.**

सर्वसामान्य व्यक्तीने समाधिपर्यंत पोहचण्यासाठी यम या पहिल्या पायरीपासून सुरूवात करावी आणि आपले ध्येय प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा.

१.**आसन: शारीरिक सुदृढता**
२.**शुद्धिक्रिया: शरीराची अंतर्गत शुद्धता**
३.**प्राणायम: मानसिक स्वास्थ व जीवन शक्तीचा विकास**

योग धर्म, श्रद्धा, विश्वास, आस्था यापलिकडील प्रायोगिक विज्ञान आहे. म्हणून प्रत्येकाने आपापल्या क्षमता जाणून आपल्या दिनचर्येत योगाचा समावेश करून तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली योगिक प्रक्रियांचा अभ्यास करून शारीरिक व मानसिक स्वास्थ प्राप्त करून वृद्धिंगत करावे आणि स्वकल्याणासोबतच कुटूंबाचे, समाजाचे आरोग्य टिकविण्याचा प्रयत्न करून सुखी व आनंदी जीवन जगण्याचा प्रयत्न करावा.

— प्रा. देवानंद सुधाकरराव सोनार



# ‘एक संधी स्वत:साठी’

दहावी–बारावीची परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला एक मोठा टप्पा. या परीक्षा पास झाल्यावर पुढे काय करायचं, करिअरसाठी कोणतं क्षेत्र निवडायचं, याचा निर्णय सगळ्याच विद्यार्थ्यांना घ्यावा लागतो. कोणी विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे क्षेत्र निवडतात, तर कुणी पालकांची इच्छा म्हणून एखादा कोर्स निवडतो. काही विद्यार्थी तर केवळ मित्रमैत्रिणी करत आहेत म्हणून त्या कोर्सला प्रवेश घेतात. पण हळूहळू सत्यपरिस्थिती समोर येवू लागते. सुरूवातीचे महिने सरतानाच आपण जो कोर्स करतोय, तो आपल्याला जमत नाही, हे वास्तव उघड होवू लागतं. अनेक विद्यार्थ्यांना अशा परिस्थितीत नैराश्य येवू लागतं. काहीजण आपण निवडलेलं क्षेत्र सोडून देण्याचा विचार करू लागतात. पण मित्रांनो थोडं थांबा. तुम्ही प्रवेश घेतलेलं क्षेत्र असं मध्येच सोडून देण्यापूर्वी काही गोष्टींचा नीट विचार करा.

तुम्ही आता ज्या कोर्सला प्रवेश घेतला आहे, तर तुम्हाला स्वत:ला एक संधी देणं आवश्यक आहे. अभ्यास न जमण्याचं नेमकं कारण शोधा. तुम्ही तुमच्या मनाचं ऐकून कोणताही निर्णय घेवू नका. तर आपल्या मेंदूलाही विचार करण्याची एक संधी द्या आणि त्यानुसार अंमलबजावणी करा. तुम्ही ज्या कोर्सला प्रवेश घेतला आहे, तो कोर्स अर्धा झाला असेल किंवा काही वेळेस तर पूर्ण होत आला असेल, अशा वेळी आपण प्रवेश घेतलेला तो कोर्स पूर्ण करणं, हेच काय ते शहाणपणाचं ठरतं. सध्या तुम्ही घेतलेला हा कोर्स आधी पूर्ण करा आणि मग काय, ते क्षेत्र किंवा कोर्स बदलायचा विचार करा.

एक लक्षात घ्या की, दिवसेंदिवस प्रत्येक क्षेत्रातील स्पर्धा वाढत आहे. निकालाची टक्केवारी वाढत असून त्या तुलनेत शैक्षणिक संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या सीटस् मर्यादित प्रमाणात आहेत. त्यामुळे तुम्ही आता जो कोणता कोर्स करत आहात, तो मध्येच सोडून देणं शहाणपणाचं ठरणार नाही. विद्यार्थी एक गोष्ट विसरतात, ती म्हणजे फक्त दहावी–बारावीनंतरच करिअरचे पर्याय निवडता येतात असं नाही, तर ग्रॅज्युएशन नंतरही तुमच्याकडे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे आता ज्या कोर्सला प्रवेश घेतला आहे तो पूर्ण करणंच योग्य ठरेल.

थोडा संयम बाळगा आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. जोमाने अभ्यासाला लागा आणि आताचा अभ्यासक्रम पूर्ण करा. हा कोर्स तुम्ही यशस्वीपणे पूर्ण केलात, तर तुम्हाला ग्रॅज्युएशन नंतरही अनेक चांगले पर्याय शोधता येतील, निवडता येतील.

हा कोर्स सोडून दुसरा कोणता कोर्स करायचा याची माहिती घ्या, त्या कोर्सला प्रवेश घेण्यासंबंधित पूर्वतयारी करा आणि आपलं ध्येय साध्य करा. यामुळे केवळ तुमचा आत्मविश्वास दुणावेल असं नाही, तर तुमची कौशल्य विकसित होतील, तुमचं ज्ञान वाढेल. याचा फायदा तुमच्यासमोर संधींची अनेक कवाडं खुली होतील.

## एसडी–सीडच्या शिरपेचात मानाचा तुरा

एसडी–सीडने केवळ विद्यार्थीकेंद्र मानून त्यांच्यासाठी सुरू केलेल्या ‘ज्ञानयज्ञ’ या इंग्रजी व मराठी बातमीपत्राला आयसीई या संस्थेने २०१६ सालचा पुरस्कार देवून गुणवत्ता प्रमाणपत्राने सन्मानित करण्यात आले आहे.

सर्वोत्तम प्रतिभा आणि सर्जनशीलता असलेल्या बातमीपत्रांचा आयसीई (In-house Communication Excellence) पुरस्काराने गौरव करण्यात येतो. या पुरस्कारासाठी सातशेहून अधिक नोंदी आलेल्या होत्या व अव्वल १०० गुणवंत बातमीपत्रांमधून ‘ज्ञानयज्ञ’ची निवड करण्यात आली आहे.



## आमची उद्दिष्टे

* सर्व पात्र विद्यार्थ्यांना 21व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
* सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
* सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल.

## लाभार्थ्यांचे मनोगत...



**दिपक मदन पाटील, चोपडा (Beneficiary 2012-13, Education: BE Mechanical Completed)**

Dear Sir,

I am very happy to inform you all SD-SEED Team. From last two months, I am in Germany for Design & Development Training. Very Thankful of Shri Sureshdada and SD-SEED Team, with your motivational thoughts and financial support, I achieved this.

I had taken hard efforts at the time my college, studied hard in difficult conditions. I was one of student, who selected in Campus Interview from my batch and got good package. After comeback to India, I will definitely participate in SD-SEED and support poor students of our District.

Thank you again. God bless you and give long life.

---



**प्रणिता किशोर भावसार, जळगाव (Education in 2016-17: BPTh – Fourth Year)**

I am grateful and thankful to SD-SEED for all their guidance and economical support for my graduation studies for BPTh Degree. Now its been my final year in this education for Physiotherapy and I am happy that a major contribution for my success and education has major role model as 'SD-SEED' being my back-bone for education. I am very thankful that today I can proudly say that in future, I may promisingly help the needy person for education and my success will surely pay off for this.

Thanking you.

---



**अनिल दगडू माळी, चोपडा (Education in 2016-17: BTech Mechanical - Third Year)**

मागील चार वर्षापासून मी एसडी–सीड योजनेंतर्गत खान्देशातील विद्यार्थ्यांना मिळणा–या शैक्षणिक शिष्यवृत्तीचा लाभ घेत आहे. माननीय श्री. सुरेशदादा जैन यांनी उभारलेली एसडी–सीड ही भव्यदिव्य संस्था आहे जी खान्देशातील गोरगरिब गुणवंत विद्यार्थ्यांकरिता आर्थिक मदतकेंद्र आहे. यामुळे मी माझ्या आर्थिक अडचणींवर आतापर्यंत मात करीत आहे. माझ्या मते गोरगरिबांना केलेली ही एक अनमोल मदत आहे. दादांनी आमच्यासाठी वेळेवर केलेली आर्थिक मदत दैवरूपी आहे. दादांनी हे सत्र असेच पुढे चालू ठेवावे, ही विनंती.

---



**ऋचा हेमंत बेलसरे, जळगाव (Education in 2016-17: BE Electrical - Fourth Year)**

मी इंजिनीअरींगच्या शेवटच्या वर्षात शिकत असून मागील पाच वर्षापासून मी एसडी–सीडची शिष्यवृत्ती लाभार्थी आहे. माझ्यासारख्या गरजू विद्यार्थ्यांना एसडी–सीडकडून शिष्यवृत्तीमार्फत हा जो मदतीचा हात मिळतो आहे तो अतिशय स्तुत्य असा उपक्रम आहे. मुलांच्या पाठीवर मदतीचा हात ठेवणा–या एसडी–सीडची मी खुप आभारी आहे कारण माझ्या शिक्षणात यांची मला मोलाची साथ मिळत आहे. हा उपक्रम असाच सुरू राहून अनेक मुलांना याचा लाभ मिळेल अशी मला अपेक्षा आहे. पुन्हा एकदा एसडी–सीडचे खुप खुप धन्यवाद!

एसडी-सीड शिष्यवृत्ती २०१६ च्या विस्तृत माहितीसाठी पुढील पान पाहा.



**प्रेरणास्थानः** मा.आ.श्री. सुरेशदादा जैन

SD SEED

Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development

सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना



मातोश्री श्रीमती प्रेमाबाई मिकमचंदजी जैन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

आमचे ध्येयः गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.

# एसडी-सीड उच्चशिक्षण शिष्यवृत्ती - २०१६

*गुणवान लेकरांची ही अखंड ज्ञानसाधना।*
*घडविण्या भविष्य तयांचे, जागवू संवेदना॥*

## शिष्यवृत्तीत समाविष्ट

- ट्युशन फी
- वसतिगृह शुल्क
- खानावळ खर्च
- पाठ्यपुस्तके

## शिष्यवृत्ती व्यतिरिक्त इतर विविध सहायता योजना

- बँक व अन्य वित्तीय संस्थांकडून शैक्षणिक कर्ज
- अन्य शहरांमधील निवास व्यवस्थेबद्दल माहिती
- ग्रंथालयांच्या सदस्यत्वामध्ये व क्लासेस फीमध्ये सवलत
- पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य खरेदीमध्ये सवलत

## शिष्यवृत्तीची पात्रता

- गतवर्षी २०१५ चे एसडी-सीड शिष्यवृत्ती लाभार्थी
- जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थी
- बारावी इयत्ताः ग्रामीण विद्यार्थी ७०%, शहरी विद्यार्थी ७५%
- विद्यार्थ्याला एमएच-सीईटी/समकक्ष परीक्षेत ≥ १२० गुण
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.१,५०,०००/-
- दोन किंवा त्यापेक्षा जास्त विषयात नापास (ATKT) झालेले विद्यार्थी नूतनीकरणासाठी पात्र नाहीत.
- D.T. Ed. च्या द्वितीय वर्षाला शिकत असलेले विद्यार्थी नूतनीकरणासाठी पात्र नाहीत.

## उपक्रमाची ध्येयपूर्तीकडे वाटचाल

- मागील आठ वर्षांपासून गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप
- आतापर्यंत ११,५०० हून अधिक विद्यार्थ्यांना लाभ
- २,५०० विद्यार्थ्यांचे उच्चशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण
- शिक्षकांना प्रशिक्षण व पालकांचे प्रबोधन
- ११,००० हून अधिक विद्यार्थ्यांना विविध विषयांवर प्रशिक्षण
- विद्यार्थी हितासाठी १२६ संस्थांसोबत सहकार्य करार

## महत्त्वाच्या सूचना

- अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरून पोचपावतीची प्रिंट आवश्यक कागदपत्रे जोडून **दि. १५ ऑक्टोबर २०१६** पर्यंत एसडी-सीड कार्यालयात पाठविणे.
- लक्षणीय प्रगती केलेल्या लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीत वाढ
- अनाथ तसेच शारीरिक अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार

सर्वंकष निकषानुसार सन २०१६ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

- **ऑनलाईन अर्ज दि. १५ ऑक्टोबर २०१६ पर्यंत www.sdseed.in वर उपलब्ध आहे.**
- आवाहनः कोणतीही संस्था किंवा व्यक्ती जळगांव जिल्ह्यातील गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती निधी किंवा इतर लाभ देण्यास इच्छुक असतील, त्यांनी एसडी-सीडच्या कार्यालयात (०२५७) २२३५२५४ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा gb@sdseed.in या ई-मेलवर संपर्क साधणे.
- विद्यार्थ्यांना एसडी-सीड व्यतिरिक्त इतर विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळावा, यासाठी एसडी-सीडच्या वेबसाईटवर **ज्ञानकोष** या विभागात सविस्तर माहिती उपलब्ध आहे.

## विनीत

### मार्गदर्शन समिती

**मा. प्राचार्य अनिल राव, प्रा. जी.ए. चौधरी, प्रा. डॉ. एस.बी. चौधरी, मा. प्रा. डॉ. किसनराव पाटील, प्रा. यु.डी. पाटील, प्रा. एस.व्ही. सोमवंशी, डॉ. नरेन्द्र जैन, श्री. भगवान भटकर, प्राचार्य डॉ. अजित वाघ, प्रा. डॉ. शांताराम बडगुजर, डॉ. सौ. गौरी राणे, प्रा. सौ. अंजली बर्वे, श्री. मिलींद कुलकर्णी, प्रा. डी.टी. नेहते, प्रा. सुरेश पांडे, श्री. अजित कुचेरीया, डॉ. विजय माहेश्वरी, श्री. दादा नेवे, सौ. पुष्पा भंडारी, श्री. सुभाष लोढा**

### तालुका समन्वयक

**श्री. सुरेशचंद्र धारीवाल, जामनेर; श्री. सुरेश भंडारी, भडगाव; श्री. मा.आ. चिमणराव (आबा) पाटील, पारोळा; श्री. गोविंददादा मुंदडे, अमळनेर; श्री. दिपेश कोटेचा, भुसावळ; श्री. विनोद कोटेचा, बोदवड; श्री. पप्पुशेठ बडोला, पाचोरा; डॉ. सुरेश अलीझाड, चोपडा; श्री. भंवरलाल जैन, चाळीसगाव; श्री. बबनलाल भिकूलाल अग्रवाल, रावेर; श्री. अजितकुमार रेदासनी, मुक्ताईनगर; श्री. चंद्रकांत जे. चौधरी, यावल; श्री. सुभाष बिर्ला, एरंडोल; श्री. शैलेश जाजू, धरणगाव**

### गव्हर्निंग बॉडी

**प्राचार्य डॉ. एस.एस. राणे, प्रा. श्री. नंदलाल गादिया, श्री. नीळकंठ गायकवाड, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, प्रा. जीवन खिंवसरा, श्री. संदिप पगारीया, डॉ. सुरेश अलीझाड, श्री. राजेश यावलकर, डॉ. आर.एस. डाकलिया, श्री. महेश गोरडे**

**मिनाक्षी जैन**
कार्याध्यक्षा

**सौ. रत्नाभाभी जैन**
अध्यक्षा

**डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी**
चेअरमन, गव्हर्निंग बॉडी

**Head Office:**
7, Shivaji Nagar, Jalgaon - 425 001, Maharashtra, India | Tel: (0257) 2235254 | Fax: (0257) 2234258 | Website: www.sdseed.in